# अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक, कांदळवन कक्ष, मुंबई यांचे कार्यालय,

३०२, वेक फिल्ड हाऊस,३ रामजला, ब्रिटानियारेस्टोरंटजवळ, बॅलार्डइस्टेट, फोर्ट,मुंबई-४००००१.

दुरध्वनीक्र.०२२-२२६९४९८५/८४ Email cccfmangrove@mahaforest.gov.in /ccfmmumbai@gmail.com


जा.क्र.कक्ष-१/पाणथळ समिती/१३२/सन २०२४ - २५ दिनांक: १३.११.२०२४

प्रति,

१. मा. विभागीय आयुक्त, कोकण विभाग, नवी मुंबई.
२. मा. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक, कांदळवन कक्ष, मुंबई.
३. मा. जिल्हाधिकारी, मुंबई/मुंबई उपनगर/ठाणे/पालघर/रायगड/रत्नागिरी/सिंधुदूर्ग
४. मा. पोलिस आयुक्त, मुंबई/ठाणे.
५. मा.जिल्हा पोलीस अधिक्षक, ठाणे(ग्रामीण)/पालघर/रायगड/रत्नागिरी/सिंधुदूर्ग
६. मा.संचालक, पर्यावरण विभाग, MCZMA
७. मा. आयुक्त / सह आयुक्त महानगरपालिका बृहन्मुंबई/ठाणे/कल्याण-डोंबिवली/मिरा-भाईंदर/वसई-विरार/नवी मुंबई/पनवेल/भिवंडी-निझामपुर, उल्हासनगर)
निजामपूर/ उल्हासनगर (उपआयुक्त व त्यावरील दर्जाचे अधिकारी)
८. मा.अपर आयुक्त, विभागीय आयुक्त यांचे कार्यालय, कोकण विभाग
९. मा.उप वनसंरक्षक (कांदळवन कक्ष), मुंबई.
१०. प्रादेशिक आधिकारी, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, मुंबई
११. नगर रचना विभागाचे अधिकारी / शहर आणि औद्योगिक विकास महामंडळ (सिडको)
१२. श्री. स्टॅलिन डी, वनशक्ती (NGO)
१३. डॉ.महेश शिंदीकर, Applied dept.of Science, College of Engineering Pune, Wellesy Road, Shivaji Nagar, Pune.

**विषय :- कोकण पाणथळ तक्रार निवारण समितीच्या ५० व्या बैठकीचे मंजूर इतिवृत्त.**

**संदर्भ** :- या कार्यालयाचे जा.क्र.कक्ष-१/पाणथळ समिती/१२०/सन २०२४-२५, दिनांक २८.१०.२०२४ रोजीचे पत्र.

उपरोक्त संदर्भान्वये कोकण पाणथळ तक्रार निवारण समितीची ५० वी बैठक मंगळवार, दि.२८.१०.२०२४ रोजी **मा. विभागीय आयुक्त तथा अध्यक्ष, कोकण विभाग यांचे अध्यक्षतेखाली** घेण्यात आली होती.

सदर बैठकीचे मंजूर इतिवृत्त आपणास माहिती व पुढील कार्यवाहीसाठी पाठविण्यात येत आहे. तरी, कृपया अवलोकन होणेस विनंती आहे.

सोबत :- वरीलप्रमाणे

(डॉ. शैलेंद्रकुमार जाधव, भा.व.से.)
सदस्य सचिव,
कोकण पाणथळ तक्रार निवारण समिती
तथा उप वनसंरक्षक, कांदळवन कक्ष, मुंबई

## कोकण पाणथळ तक्रार निवारण समितीची ५० वी बैठक
## दिनांक २८.१०.२०२४ रोजीचे इतिवृत्त

समितीचे विभागीय आयुक्त तथा अध्यक्ष, कोकण विभाग यांच्या अध्यक्षतेखाली कोकण पाणथळ तक्रार निवारण समितीची मा. विभागीय आयुक्त यांचे दालनात, कोकण विभाग, कोकण भवन, सी.बी.डी.बेलापूर, नवी मुंबई येथे ५० वी बैठक पार पडली. समितीच्या सदस्य सचिव यांनी उपस्थितांचे स्वागत केले व मा.अध्यक्ष यांच्या अनुमतीने समितीच्या कामकाजास सुरुवात झाली. सदर बैठकीस खालील नमूद अधिकारी व कर्मचारी व्यक्तीशः अथवा व्हि.सी.व्दारे उपस्थित होते.

| अ.क्र. | नाव | पद | कार्यालय |
|---|---|---|---|
| १. | डॉ. राजेश देशमुख, भा.प्र.से. | अध्यक्ष तथा विभागीय आयुक्त | विभागीय आयुक्त, कोकण विभाग, कोकण भवन यांचे कार्यालय |
| २. | श्री. एस. व्ही. रामाराव, भा.व.से. | सह अध्यक्ष तथा अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (व्ही.सी.द्वारे) | कांदळवन कक्ष, मुंबई |
| ३. | डॉ.शैलेंद्रकुमार जाधव, भा.व.से. | सदस्य सचिव तथा उपवनसंरक्षक | कांदळवन कक्ष, मुंबई |
| ४. | श्री.राजेंद्र शं. क्षीरसागर, भा.प्र.से. | जिल्हाधिकारी (व्ही.सी.द्वारे) | जिल्हाधिकारी कार्यालय, मुंबई उपनगर |
| ५. | श्री.अशोक शिंनगारे, भा.प्र.से. | जिल्हाधिकारी (व्ही.सी.द्वारे) | जिल्हाधिकारी कार्यालय, ठाणे |
| ६. | श्री.एम देवेंदर सिंग, भा.प्र.से. | जिल्हाधिकारी (व्ही.सी.द्वारे) | जिल्हाधिकारी कार्यालय, रत्नागिरी |
| ७. | श्री.अनिल पाटील, भा.प्र.से. | जिल्हाधिकारी (व्ही.सी.द्वारे) | जिल्हाधिकारी कार्यालय, सिंधुदुर्ग |
| ८. | श्री.विशाल मदने | अवर सचिव (व्ही.सी.द्वारे) | पर्यावरण व वातारवणीय बदल विभाग, मंत्रालय, मुंबई (MCZMA) |
| ९. | श्री.अभय पिंपळकर | संचालक (व्ही.सी.द्वारे) | पर्यावरण विभाग, मंत्रालय, मुंबई |
| १०. | श्री.मच्छिंद्र सुकटे | निवासी उपजिल्हाधिकारी (व्ही.सी.द्वारे) | जिल्हाधिकारी कार्यालय, सिंधुदूर्ग |
| ११. | श्री.सुभाष भागडे | निवासी जिल्हाधिकारी (व्ही.सी.द्वारे) | जिल्हाधिकारी कार्यालय, पालघर |
| १२. | श्री.दत्तात्रय नवले | जिल्हाधिकारी,रायगड यांचे प्रतिनिधी (उ.जि.भू.मेट्रो) | जिल्हाधिकारी कार्यालय, रायगड |
| १३. | श्री.प्रदीप रा.तावरे | जिल्हाधिकारी, मुंबई शहर यांचे प्रतिनिधी (सहा.अधीक्षक) | जिल्हाधिकारी कार्यालय, मुंबई शहर |
| १४. | श्री.दिपक खाडे | विभागीय वन अधिकारी (व्ही.सी.द्वारे) | मुंबई कांदळवन संधारण घटक, उत्तर कोकण |
| १५. | श्रीमती कांचन ज्ञानोबा पवार | विभागीय वन अधिकारी | मुंबई कांदळवन संधारण घटक, दक्षिण कोकण |
| १६. | सौ.गिरिजा देसाई | विभागीय वन अधिकारी (व्ही.सी.व्दारे) | चिपळूण |
| १७. | श्री.सुधीर लक्ष्मण मांजरे | वनपरिक्षेत्र अधिकारी | नवी मुंबई |
| १८. | श्री.स्टॅलिन डी | संचालक | वनशक्ती (NGO) |
| १९. | सौ.मनिषा प्रधान | मुख्य पर्यावरण अधिकारी | ठाणे महानगरपालिका, ठाणे |
| २०. | श्री.सुदेश अ. परब | सहा. आयुक्त, परि -१ | नवी मुंबई महानगपालिका, बेलापूर भवन |
| २१. | श्री.विशाल कदम | सहाय्यक आयुक्त | उल्हासनगर महानगरपालिका |
| २२. | श्री.जगदीश पाटील | वरिष्ठ नियोजनकार | सिडको |
| २३. | श्री. दिपक धरवंदे | व.आरेखक | सिडको |

| | | | |
|---|---|---|---|
| २४. | श्री.जगदीश एकनाथ वाळुंजवानी | उप अधीक्षक | सॉल्ट विभाग, मुंबई |
| २५. | श्री.अनिल वि. पंडित | प्रकल्प कार्यकारी | BOMBAY ENVIRONMENT ACTION GROUP |
| २६. | डॉ. रेश्मा पितले | शास्त्रज्ञ | BNHS, मुंबई |
| २७. | SRO-MPCB Ratnagiri | प्रतिनिधी (व्ही.सी.द्वारे) | रत्नागिरी |
| २८. | पोलिस अधिक्षक | प्रतिनिधी (व्ही.सी.द्वारे) | रत्नागिरी |
| २९. | श्री.अभिजित भुजबळ | पोलीस निरीक्षक | सुरक्षा शाखा, रायगड |
| ३०. | श्री.विवेक सोनावणे | पोलीस निरीक्षक | काशीमिरा पोलीस स्टेशन |
| ३१. | श्री.अजय गोरड | पोलीस निरीक्षक | सुरक्षा शाखा, पालघर |
| ३२. | श्री.अरुण र.भोर | सहा. पोलीस निरिक्षक | ऑपरेशन कार्यालय, समन्वय मुंबई शहर |
| ३३. | श्री.एम सिद्राम राजमाने | वरीष्ठ पोलीस निरिक्षक | विशेष शाखा (सुरक्षा विभाग), ठाणे शहर आयुक्तालय |
| ३४. | श्री.एस.एन.मुसळे | सहा.पोलीस निरिक्षक | नागरी सुरक्षा शाखा, पालघर |
| ३५. | श्री.नितीन खाडे | सहा.पोलीस निरिक्षक | उरण पोलीस ठाणे, पोर्ट विभाग, नवी मुंबई. |
| ३६. | सौ.सरिता निलकंठ मुसके | सागरी सुरक्षा | सागरी शाखा, पालघर |

| अ.क्र | विषय | कार्यवाही |
| --- | --- | --- |
| १ | मागील बैठकीच्या इतिवृत्ताचे अनुषंगाने चर्चा. | • कोकण पाणथळ तक्रार निवारण समितीच्या ५० व्या बैठकीच्या सुरुवातीस समितीचे मा.अध्यक्ष तथा विभागीय आयुक्त, कोकण मा.डॉ.राजेश देशमुख, भा.प्र.से. यांचे स्वागत डॉ.शैलेंद्रकुमार जाधव, सदस्य सचिव यांनी केले. त्यानंतर, या समितीच्या बैठकीस उपस्थितीत सर्व जिल्हाधिकारी, संचालक, पर्यावरण विभाग, उपविभागीय अधिकारी, विभागीय वन अधिकारी, सर्व महानगरपालिकेचे प्रतिनिधी, वरिष्ठ नियोजनकार, सिडको, पोलिस निरीक्षक तसेच, महाराष्ट्र प्रदूषण मंडळ यांचे प्रतिनिधी व व्हि.सी.व्दारे उपस्थित सर्व अधिकारी कर्मचारी या सर्वांचे स्वागत केले.<br>• दि. २८ मे, २०२४ रोजी झालेल्या कोकण पाणथळ तक्रार निवारण समितीच्या ४९ व्या बैठकीमध्ये मा.अध्यक्ष यांनी दिलेल्या सूचनेनुसार समितीचे सदस्य सचिव यांनी कोकण पाणथळ तक्रार निवारण समितीची कार्यकक्षा, पाणथळ म्हणजे काय?, व्याप्ती, संदर्भ, उद्दिष्टे व अटी आणि कायदेशीर अधिकार या बाबींवरती सादरीकरणाव्दारे बैठकीस सर्व उपस्थितींना अवगत केले.<br>• त्यानंतर, मा.अध्यक्ष यांनी कोकण पाणथळ तक्रार निवारण समितीकडे प्राप्त तक्रारींच्या सद्यस्थितीचा जिल्हानिहाय आढावा घेतला. यामध्ये, अशासकीय सदस्य, श्री.स्टॅलिन, संचालक, वनशक्ती यांनी देश पातळीवर ISRO या संस्थेने Wetland Atlas (NWIA, May, २०१०) प्रकाशित केला असून यामध्ये समाविष्ट केलेल्या Wetland Atlas मधील कोकण विभागातील सर्व जिल्ह्यामध्ये असणारे पाणथळ क्षेत्र (Wetlands) यांचे संरक्षण करण्यासाठी मा.उच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार ही समिती गठीत करण्यात आली असल्याचे सांगितले तसेच, या समितीव्दारे कोकण विभागातील तहसिलदार, इतर महसूल अधिकारी, तालुका स्तरीय पोलीस अधिकारी यांना पाणथळ क्षेत्राचे संरक्षण, संवर्धन व पुर्नस्थापना करणेसाठी उचित कार्यवाही करणे क्रमप्राप्त असल्याचे देखील सांगितले.<br>• सदर बैठकीत मा.जिल्हाधिकारी, ठाणे यांनी त्यांच्याकडील प्राप्त तक्रारींबाबत सिडको विभागाकडून मागविण्यात आलेले अहवाल अप्राप्त असल्याचे सांगितले तसेच, तक्रार क्र. WC ८१- अशासकीय सदस्य, यांच्या तक्रारीवर कांदळवनाचे नुकसान झालेबाबत सेक्शन १५ व १९ खाली गुन्हे दाखल करण्यात आले आहेत तसेच, सदर ठिकाणाचा डेब्रिज शास्त्रीयरित्या उचलण्याबाबत ठाणे, महानगरपालिका यांना कळविण्यात आले आहे. याबाबत, ठाणे, महानगरपालिकडून अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून त्याबाबत, तरतूद नसल्याने सदर अंदाजपत्रक डी.पी.सी. कडे पाठविण्यात आले आहे. तथापि, डी.पी.सी.कडे असे प्रस्ताव पाठवून उपयोग नाही कारण, डी.पी.सी. विहित लेखाशिर्ष असलेल्याबाबींवर खर्च करु शकते यामुळे यासंदर्भात ठाणे, महानगरपालिकेस पुन्हा सूचना देउन कळविण्यात येईल व तातडीने कार्यवाही करण्याबाबत सूचना देण्यात येतील असे सांगितले.<br>• तसेच, निवासी उपजिल्हाधिकारी, पालघर यांनी पालघर जिल्ह्याचे एकूण ६ तक्रारी असल्याचे सांगितले व श्री.दामोदर शिंगडा (तक्रार क्र. ८६) यांच्या तक्रारीबाबत तक्रारींतील क्षेत्र पाणथळ क्षेत्र हे Wetland Brief Document मध्ये समाविष्ट नसल्याचे बैठकीत सांगितले. याबाबत, व्हि.सी.व्दारे उपस्थित डॉ. अभय पिंपरकर, संचालक, पर्यावरण विभाग यांनी Wetland Brief Doucment सर्व जिल्ह्यांनी पाठविलेले होते व ते Wetland Authority समोर ठेवण्यात आले. सदरहू Wetland Brief Document Wetland Rules प्रमाणे बनविण्यात आले नसल्याने मागिल तीन व चार वर्षापासून पाठपुरावा सुरु असल्याचे सांगितले व त्यामुळे, सदर काम केंद्र शासनाच्या पर्यावरण खात्याकडील संस्थेला दिले असून त्याबाबत कार्यवाही सुरु आहे. तसेच, मा.सर्वाच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशानुसार Wetland Atlas मध्ये संपूर्ण देशात एकूण २,०१,५६७ पाणथळ क्षेत्र समाविष्ट करण्यात आले असल्याचे देखील बैठकीत सांगितले. |

| अ.क्र | विषय | करावयाची कार्यवाही |
| --- | --- | --- |
| २ | मा.अध्यक्ष यांनी दिलेल्या सूचना | • मा.अध्यक्ष यांनी पाणथळ व कांदळवन ठिकाणचे डेब्रिज शास्त्रीयरित्या उचलण्याबाबत जिल्हा नियोजन समिती (DPC) कडे समर्पित लेखाशिर्ष (Dedicated Head) अथवा शासन निर्णय नसल्याने जिल्हा नियोजन समिती कडून एवढ्या मोठ्या प्रमाणात निधी मिळणे तितके सोपे नसणार आहे. त्यामुळे, महानगरपालिका व इतर स्वायत्त यंत्रणांनी सदर निधीसाठी मा.उच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार सनियंत्रण समितीच्या कामाचा आढावा घेण्यासाठी गठीत करण्यात आलेल्या शासन स्तरावरील मा.अपर मुख्य सचिव (महसूल) यांच्या अध्यक्षतेखालील समितीपुढे सादर करावे लागणार आहे. त्यामुळे, पाणथळचे पुर्नस्थापन (Restoration) करण्यासाठी जिल्हास्तरीय समितीने अंदाजपत्रके तयार करुन त्याकरिता आवश्यक निधीसह (Associated Cost) जिल्हाधिकाऱ्यांनी / महानगरपालिका व इतर स्वायत्त संस्थांनी सर्व बाबी समाविष्ट करुन अंदाजपत्रके समितीच्या पुढील बैठकीपूर्वी सादर करणेबाबत मा.अध्यक्ष यांनी सूचना दिल्या.<br>• तसेच, मा.अध्यक्ष यांनी बैठकीत उपस्थित सिडको यांच्या प्रतिनिधींना ठाणे जिल्ह्यातील तक्रारींबाबत कायदेशीर सल्ला (legal Opinion) घेऊन याबाबतचा सविस्तर अहवाल जिल्हाधिकारी,ठाणे यांचेमार्फत समितीच्या पुढील बैठकीपूर्वी सादर करणेबाबत सूचना दिल्या व सिडको यांना त्याबाबतचे पत्र देण्याबाबत सदस्य सचिवांना निर्देश दिले.<br>• त्याचप्रमाणे, मा.विभागीय आयुक्त तथा अध्यक्ष, कोकण विभाग यांनी समितीकडे प्राप्त जिल्हानिहाय तक्रारींबाबत संबंधित जिल्हाधिकाऱ्यांनी संचालक, पर्यावरण विभाग, मंत्रालय, मुंबई यांच्याशी समन्वय साधून CRZ, MRSAC आणि वेटलँड ॲटलस नकाशा तपासून केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीच्या पुढील बैठकीपूर्वी समितीस सादर करण्याबाबत सूचना दिल्या. |

(डॉ.शैलेंद्रकुमार जाधव, भा.व.से.)
सदस्य सचिव,
कोकण पाणथळ तक्रार निवारण समिती
तथा उपवनसंरक्षक, कांदळवन कक्ष

(डॉ. राजेश देशमुख, भा.प्र.से.)
अध्यक्ष,
कोकण पाणथळ तक्रार निवारण समिती
तथा विभागीय आयुक्त, कोकण विभाग